मुख प्रत

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, (आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स) पाचगणी,
ता. महाबळेश्वर, जि. सातारा. ४१२८०५





भाषा विभागांच्यावतीने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# "मराठी, हिंदी व इंग्रजी साहित्यातील देशीवाद"

शनिवार दि. २३ सप्टेंबर, २०१७

अध्यक्ष

मा. प्राचार्य डॉ. अरुण गाडे

समन्वयक

डॉ. अशोक तवर (मराठी)

प्रा. जयवंत जाधव (हिंदी)

डॉ. सुरेश पाटील (इंग्रजी)

सह समन्वयक

प्रा. नरेंद्र फडतरे (हिंदी), प्रा. जयंत शिंदे (इंग्रजी),
प्रा. वामन सरगर (मराठी), प्रा. माणिक वांगीकर (मराठी)
प्रा.एस.एस.शेलार (इंग्रजी), प्रा. अशोक गाडेकर (इंग्रजी)

-: **Published By** :-

**Gurukul International Multidisciplinary Research Journal**

ISSN 2394-8426 with International Impact Factor 3.325 | UGC Approved Journal Sr. No. 48455

**Online Available At : www.gurukuljournal.com**

Scanned by CamScanner

National Conference On "Deshiwad in Marathi, Hindi & English Literature"On Date : 23rd Sep., 2017
ISSN 2394-8426*with* International Impact Factor 3.325 | UGCApproved Journal Sr. No.48455

# अनुक्रमणिका



| अ.नं. | निबंधाचे नाव | संशोधक | पान . नं |
|---|---|---|---|
| १ | देशीवाद संकल्पना व स्वरूप | प्रा. रुपाली शिंदे | १०–१६ |
| २ | देशीवाद इतिहास आणि परंपरा | डॉ. उदय जाधव | १७–२३ |
| ३ | कादंबरी साहित्यातील देशीवाद | डॉ. रमेश पोळ | २४–२८ |
| ४ | देशीवादी मूल्यविचार | डॉ. अशोक तवर | २९–३५ |
| ५ | प्रभावी समीक्षा–देशीवाद अथवा देशीयता | डॉ. डांगे, डॉ. नावडकर | ३६–४० |
| ६ | 'जोहार' कादंबरीतील देशीवाद | डॉ. एकनाथ आळवेकर | ४१–४३ |
| ७ | देशीवाद एक विचार | प्रा.एस.बी.डफळापूरकर | ४४–४६ |
| ८ | देशीवाद आणि जागतिकीकरण | प्रा.लक्ष्मण बोराटे | ४७–५१ |
| ९ | मराठी साहित्यातील देशीवादाची स्थित्यंतरे | प्रा.शहाजी पारसे | ५२–५५ |
| १० | देशीवाद एक साहित्यसिद्धांत | डॉ. सविता व्हटकर | ५७–५९ |
| ११ | देशीवाद स्वरूप आणि संकल्पना | डॉ. प्रतिभा पाटणे | ६०–६३ |
| १२ | देशीवाद संकल्पना व स्वरूप | डॉ. अनिल बांगर | ६४–७२ |
| १३ | कादंबरी साहित्यातील देशीवाद | डॉ. लिंगायत विशाल | ७३–७८ |
| १४ | मराठी साहित्यातील देशीवादाची परंपरा | श्री लक्ष्मण साठे | ७९–८५ |
| १५ | देशीवाद : संकल्पना व स्वरूप | प्रा.महेश सोनावणे | ८६–९१ |
| १६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे देशीवादाचे विचार | प्रा.अनंता कस्तुरे | ९२–९७ |
| १७ | मराठी साहित्यातील देशीवादाचे स्वरूप | प्रा.प्रदीप पाटील, प्रा. नरळे | ९८–१०३ |
| १८ | देशीवाद एक नवी समीक्षा | कु. साजिदा आरवाडे | १०४–१०६ |
| १९ | भालचंद्र नेमाडे यांचा देशीवाद | डॉ. शशिकला रणदिवे | १०७–११२ |
| २० | देशीवाद : संकल्पना व स्वरूप | प्रा.अशोक शेलार | ११३–११६ |
| २१ | आदिवासी कविता आणि देशीवाद | प्रा.गवळी रघुनाथ | ११७–१२२ |
| २२ | मराठी कादंबरीतील कथनाची देशी परंपरा | नीलेश शेळके | १२३–१२८ |
| २३ | देशीवाद रुप संरचना | कु. शीतल सालवाडगी | १२९–१३३ |
| २४ | संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेतील देशीयता | प्रा.प्रविण भोसले | १३४–१३९ |
| २५ | मंगेश नारायण काळे यांच्या कवितेतील देशीयता | प्रा.वामन सरगर | १४०–१४४ |
| २६ | देशीवाद आणि ब बळीचा | डॉ. मल्हारी मसलखांब | १४५–१५० |
| २७ | देशीवाद समाज, धर्म आणि संस्कृती.... | प्रा.मनीषा पाटील | १५१–१५६ |
| २८ | दत्ता भगत यांच्या निवडक एकांकिकातील देशीवाद | प्रा.माणिक वांगीकर | १५७–१६२ |
| २९ | देशीवाद संकल्पनाआणि मराठी अभ्यासकांची भूमिका | डॉ. संभाजी पाटील | १६३–१६८ |
| ३० | महेश एलकुंचवार यांच्या नाटकातील देशीवाद | श्री नामदेव पाटील | १६९–१७१ |
| ३१ | कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील देशीवाद | प्रा.सुतार बी.ए. | १७२–१७४ |
| ३२ | ज्ञानेश्वरी – 'देशीकार लेणे' | डॉ. महेश गायकवाड | १७५–१८१ |
| ३३ | बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील देशीवाद | प्रा.सौ. विजया पवार | १८२–१८५ |
| ३४ | साखर उद्योगातील देशीवादाचा हुंकार–शिदोरी | प्रा.राजाराम पाटील | १८६–१८७ |
| ३५ | हिंदी साहित्य में देशीवाद | डॉ. बाजीराव शेलार | १८८–१९१ |





Scanned by CamScanner

ISSN 2394-8426*with* International Impact Factor 3.325 | UGCApproved Journal Sr. No.48455

# कादंबरी साहित्यप्रकारातील देशीवाद

प्रा. डॉ. लिंगायत विशाल प्रकाश
(सहायक प्राध्यापक, मराठी विभाग)
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी
ईमेल –vishallingayat28@gmail.com
भ्रमणध्वनी:– ७५८८०२०२९०

प्रस्तावना :–

देशीवादाची संकल्पना ही अतिशय व्यापक असून तितकीच ती महत्त्वपूर्ण आहे. देशीवाद ही संज्ञा वसाहतवादाच्या विरोधात वापरली जाणारी एक वादग्रस्त अशी संज्ञा आहे. देशीवादी साहित्य म्हणजे एखादा विशिष्ट भूप्रदेश आणि त्या भूप्रदेशातील मानवाच्या संस्कृतीशी निगडीत असलेले साहित्य होय. असे साहित्य कथा, कादंबरी, काव्य, नाटक अशा कोणत्याही साहित्यकृतीशी संबंधित असू शकते. वसाहतवादाच्या काळात आणि त्यानंतरही वसाहतवादी साहित्याचा खूप मोठा प्रभाव मराठी साहित्यावर झालेला पाहावयास मिळतो. त्यामुळेच आपल्या मूळच्या परंपरेपासून आपण तुटलो. जेत्यांच्या साहित्याला श्रेष्ठ व आपल्या साहित्याला कनिष्ठ लेखण्याची सवय आपणास लागली. त्यामुळे उत्कृष्ट दर्जाचे साहित्य लिहिण्यासाठी जेत्यांच्याच साहित्याला आदर्श ठरवण्यात आले. 'जागतिकीकरणाचा आजचा चेहरा अमानवी आहे. यात देवाणघेवाण नाही. ताकदवान धनदांडगे देतील ते बाकीच्यांनी घ्यायचं, त्यांच्या तालावर नाचायचं, जगा म्हणतील तोवर जगायचं. त्यांना तुम्ही उपयोगाचे राहिला नाहीत तर मरायचं.'[१]याचाच परिणाम आपल्या साहित्यावर झाला. आपण आपली भूमी, वातावरण, संस्कृती, जीवनपद्धती, प्रदेश, जीवनमूल्ये यापासून दूर गेलो आणि इंग्रजी साहित्याची भ्रष्ट नक्कल करण्यातच धन्यता मानू लागलो. आपल्याच भाषेतील संतांना जसे ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखोबा, गोराकुंभार, विसोबा खेचर, जनाबाई, चक्रधर स्वामी, मुक्ताबाई, बहिणाबाई, महदंबा यांना आपण दूर सारुन इंग्रजीचेच भाषांतर रुपांतर करण्यात धन्यता मानू लागलो. इथल्या लोकजीवनात निर्माण झालेल्या लोकसाहित्याच्या श्रेष्ठ परंपरांशी आपला संबंध राहिला नाही. मराठी साहित्यात भालचंद्र नेमाडे, रा.भा. पाटणकर, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, इ.नीं देशीवादाचा पुरस्कार केला. ''कोणत्याही ग्रंथाचे, वाङ्मयीन चळवळीचे साहित्यिकाचे मोल आंतरराष्ट्रीय मूल्यांनी ठरत नसून आपल्या समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीपासून भाषिक प्रयोग क्षमतेपर्यंत किती भूमिका ते पार पाडू शकतात, त्यावर त्यांचे मोल ठरत असते,'' असे नेमाडे यांनी म्हटले आहे. 'देशीवाद' हा साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील सर्वाधिक वादग्रस्त असा वादविषय आहे. भालचंद्र नेमाडे यांनीच इ.स. १९८३ च्या सुमारास 'साहित्यातील देशीयता' असा एक निबंध त्याकाळात लिहिला होता. तेव्हापासूनच देशीवादाची चर्चा जोरकसपणे सुरु झाली. 'भालचंद्र नेमाडे यांची देशीयतेची संकल्पनाही ग्रामीण



Scanned by CamScanner

देशीवादावर भाष्य करणाऱ्या काही प्रमुख कादंबरीकारांपैकी आणखी एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून श्याम मनोहर हे एक लक्षणीय नाव आहे. त्यांच्या प्रमुख कादंबऱ्यांमध्ये 'शीतयुध्द सदानंद', 'हे ईश्वरराव....हे पुरुषोत्तमराव' व 'कळ' या कादंबऱ्यातून स्वातंत्र्योत्तर काळातील माणसाला पडलेले नैतिक प्रश्न उपस्थित केले जातात. त्यांच्या कादंबरीतून मनुष्याची सर्जनशीलता आणि तिला दडपून टाकणारे जग असा हा लढा असतो. श्याम मनोहर यांनी एकंदरीत मानवी जीवनातील द्वंद्वात्मकतेचा वेध घेतला आहे. आधुनिकता आणि आत्मभान या द्वंद्वातील सगळ्या ताणतणावांची अतिशय प्रभावी अशी अभिव्यक्ती त्यांनी केलेली आहे. त्यांच्या शीतयुध्द सदानंद मधील 'सदानंद' ही व्यक्तीरेखा आगळी वेगळी ठरते. कादंबरीतील श्रीरंग आणि गोविंद यांना एकाक्षणी असा साक्षात्कार होतो की, आपण लढतोय कोणाशी? 'आपण लढतोय सदानंदरावाशी, आणिक सदाशिव मजा करतोय बायकोशी.' [६] याच परंपरेत आणखी एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून कैलास दौंड या कादंबरीकाराचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. नव्वद नंतरच्या ग्रामीण साहित्य प्रवाहातील त्यांची 'कापूसकाळ' ही एक महत्त्वाची कादंबरी. या कादंबरीतील नारायणवाडी हे गाव. त्या गावातील खेडवळ माणसे, त्यांचे स्वभाव, त्यांच्या वृत्ती–प्रवृत्ती यांत जीवंतपणा आणणारी ही कादंबरी देशीयतेचा अनुभव देणारी कादंबरी म्हणून लक्षात राहते. 'कापूसकाळ' या कादंबरीतून लेखकाने 'कापूस' या एकाच पिकाभोवती उभे राहणारे शेतकरी समाजाचे वास्तव अतिशय परिणामकारक पद्धतीने मांडले आहे. शेतातील कापूस काढल्यानंतर तो विक्रीला घेऊन जाण्यासाठी ताटकळत बसलेले शेतकरी, भष्ट अधिकारी, नेते, दलाल या संबंधीचे बारीकसारीक तपशील अतिशय नेमकेपणाने मांडले आहे. या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या सामूहिक संवेदनशीलतेचे दर्शन घडते. या संपूर्ण कादंबरीला जसा मातीचा सुगंध आहे, तसा लेखकाच्या स्वानुभवाचा साजही असल्याचे दिसते. भारतासारख्या कृषीप्रधान देशात जीवनाषियी वास्तव भूमिका घेणारी कादंबरी म्हणून ही साहित्यकृती मौलिक ठरते. आजच्या सारखे आत्महत्या करणारे शेतकरी या कादंबरीत कुठेच दिसत नाहीत. उलट जगण्यासाठी धडपड करणारी माणसेच या कादंबरीतील पात्रांमधून पुढे येत राहतात. शेतकऱ्यांच्या जगण्याला नवी उभारी देणारी व बळ देणारी ही कादंबरी म्हणूनच देशीयतेचा पुरस्कार करणारी साहित्यकृती म्हणून लक्षणीय ठरते, असेच म्हणावे लागेल.

संदर्भटीपा:–

१. पठारे रंगनाथ, 'जागतिकीकरण आणि देशीवाद', लोकवाङ्मयगृह, मुंबई, प.आ., मार्च २००९,पृ. ९ (प्रस्तावना)
२. मुलाटे वासुदेव, संपादक, 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही', लेख – डॉ. मंचरकर र.बा.,'स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यातील सामाजिक व कलात्मक जाणिवा', मेहता पब्लि. हाऊस, पुणे, प्र.आ, जाने.१९९६,पृ.३३
३. पठारे रंगनाथ, उ.नि., पृ. ९ (प्रस्तावना)
४. खोत कृष्णात, 'गावठाण', मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ., डिसें. २००७, पृ.६४



Scanned by CamScanner